**नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र**
**पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.**

दिनांक 07/03/2023 (मंगळवार) सायंकाळ

---

## सदोष मनुष्यवध

पो.स्टे. वेलतुर :– अंतर्गत २० कि.मी. अंतरावरील मौजा देवळी कला येथे दिनांक ०४/०३/२०२३ चे १८.३० वा. ते १८.४३ वा. सुमारास यातील आरोपी नामे–१) देविदास दामाजी खेडकर, वय ५५ वर्ष २) सुरज रामचंद्र रंगारी वय २५ वर्ष दोन्ही रा. देवळीकला यांनी मौजा देवळी कला येथे मुख्य रस्त्यावर टाकलेल्या मंडपात हॅलोजन लाईट करीता लावलेली इलेक्ट्रीक लाईट जाण्याच्या मुख्य लाईन वरून डायरेक्ट आकोडा टाकुन घेतलेला इलेक्ट्रीक लाईन चा करंट मंडपाला लावलेला लोखंडीपोल मध्ये आल्याने मुलगा मृतक नामे–भावेश यास इलेक्ट्रीक करंट लागल्याने तो मरण पावला आहे. यातील आरोपी याने ईतरांच्या जिवीतास धोका होईल असे माहीत असुन सूध्दा अशा प्रकारे इलेक्ट्रीक लाईन डायरेक्ट टाकुन सदर मुलाच्या मरणास कारणीभुत झाला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– सारीकाबाई देविन्द्र उरकुडे, वय ३५ वर्ष रा. देवळीकला यांच्या रिपोर्टवरून पो. स्टे. वेलतूर येथे आरोपीविरुध्द कलम ३०४ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध सुरू आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. १९७ चन्द्रकांत रेवतकर मो. क्र. ८८८८१०२३०२ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर